# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे भाग्यनगर जि.नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | गु.र.नं. ३०३/२०२६ कलम ७ A भ्र.प्र.अ. १९८८ अन्वये |
| 4 | तक्रारदार | पुरुष, वय ३७ वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | गोविंद लक्ष्मण वाघ, वय ३२ वर्षे, व्यवसाय मीटर बदलणे रा. नाळेश्वर ता. जि.नांदेड, ह. मु. गुरुजी चौक नांदेड. ( खाजगी इसम) |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक ०६.०६.२०२६ रोजी १२.३० ते १४.२० रोजी जैनमंदीर स्टॅन्ड माउली मेडीकल जवळ गुळाचा चहाच्या दुकाणावर नांदेड |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक ०७.०६.२०२६ रोजी ००.०८ वाजता स्टे.डा नोंद नं ०२ वर |
| 8 | मागणी केलेली रक्कम | १३०००/- रुपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | ५०००/- रुपये |

10 **थोडक्यात माहिती –**

दिनांक ०६/०६/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, त्यांचे प्रेम नगर नांदेड येथील घर हे भाड्याने दिलेले आहे. दिनांक २१/०२/२०२६ ते दिनांक १४/०३/२०२६ दरम्यान लाईट बिल जास्त येत असले बाबत कंजूमर पोर्टलवर तक्रार केली होती. त्यावेळी दिनांक १४/०३/२०२६ रोजी तक्रारदारांचे घरी विद्युत वितरण कंपनी येथील कर्मचारी येऊन भाडेकरू यांचे मोबाईल वरून तक्रारदार यांना बोलले व सांगितले की तुमचे लाईट बिल बाबत आमच्या साहेबांकडे तक्रार प्राप्त झाली आहे. तुमचे लाईट बिल कमी करायचे असेल तर बिलाचे ५०% रक्कम द्यावी लागेल असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी पैसे देण्यास नकार देवून त्याचे नाव विचारले असता ते नाव न सांगता निघून गेले. त्यानंतर दिनांक ३१/०५/२०२६ रोजी यातील आरोपी गोविंद वाघ यांनी तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल वर कॉल करून तुमच्या घराचे मीटर खराब झाल्याचे सांगून तक्रारदार यांचे घराचे मीटर बदलून दिले आणि फोन पे वर १०००/- रुपये घेतले. त्यानंतर आरोपी गोविंद वाघ यांनी त्यांचे मागील बिल भरलेले युनिट आणि सध्या चालू असलेले बिल युनिट यामध्ये साधारण दोन हजार युनिटचा फरक आहे तुम्हाला जवळपास ३०,०००/- रुपये लाईट बिल येईल असे सांगितले. तुमचे जर ३०,०००/- रुपये बिल माफ करायचे असतील तर मला १५०००/- रुपये द्या. मी साहेबांना सांगून तुमचे मीटरचे झिरो युनिट करून देतो असे सांगून १५०००/- रुपये लाचेची मागणी केली आहे, अशा मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी दिली.

दिनांक ०६/०६/२०२६ रोजी तक्रारदार हे शासकीय पंचासह आरोपीची भेट घेण्यासाठी आरोपीस कॉल केला असता, त्यांनी मालेगाव रोड नांदेड येथील जैन मंदिर बस स्टॉप जवळ बोलावून घेतले. आरोपी गोविंद वाघ यांनी तक्रारदार यांना समक्ष भेटीदरम्यान शासकीय पंचा समक्ष तुमचे लाईट बिल जास्त आहे. त्यासाठी जास्त पैसे लागतील असे म्हणून १५०००/- रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १३०००/- रुपये स्वीकारण्याचे मान्य केले व आता ५०००/- रुपये व दोन दिवसानंतर उर्वरित ८०००/- रुपये देण्याचे ठरले.

दिनांक ०६/०६/२०२६ रोजी तक्रारदार यांना शासकीय पंचासह आरोपी गोविंद वाघ यांची भेट घेण्यासाठी मालेगाव रोड नांदेड येथील जैन मंदिराचे बस स्टॉप जवळ पाठविले. आरोपी गोविंद वाघ यांनी तक्रारदार यांच्या मीटरची रिडींग झिरो करण्यासाठी शासकीय पंचा समक्ष ५०००/- रुपये लाच स्वीकारताना रंगेहात मिळून आले आहेत. आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून पोस्टे भाग्यनगर नांदेड येथे गुरनं ३०३/२०२६ कलम ७ A भ्र.प्र.अ. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची सापळा कारवाई मा. श्री.श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक राहुल तरकसे, पोलीस निरीक्षक श्रीमती अर्चना करपुडे व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील कमांकावर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| १) श्री. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक | – ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९८२३४१०५०६ |
| २) श्री राहुल तरकसे, पोलीस उप अधीक्षक | – मो.नं. ८४११८०८३२८ |
| ३) टोल फ्रि | – १०६४ |
| ४) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी कमांक | – ०२४६२ – २५३५१२ |
| ५) Website | – www.acbmaharashtra.gov.in |
| ६) Mobile App | – www.acbmaharashtra.net |
| ७) Facebook Page | – www.facebook.com/maharashtraACB |
| ८) Twitter | – @ACBnanded |
| ९) Instagram | – acb_nanded |
| १०) Youtube Cahnnel | – @AntiCorruptionBureauNanded |
| ११) whats App number | – ८९५६५०१०६४ |

कार्यालय, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.विभाग, नांदेड युनिट

पोलीस उप अधीक्षक
ला.प्र.विभाग, नांदेड युनिट

Scanned with OKEN Scanner